# वसई विरार शहर महानगरपालिका

## विद्युत विभाग, मुख्यालय

## निविदा सुचना क्र. ०५(२०२५ - २०२६)

वसई-विरार शहर महानगरपालिका विद्युत विभागाकडील खालील कामाकरीता शासनाचे विद्युत विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदाराकडुन **बी-१ नमुन्यात दोन लखोटा** पध्दतीनुसार महानगरपालिकच्या अटी व शर्तीस अधीन राहून मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामाचे कोरे निविदा फॉर्म दि. ०८/०७/२०२५ पासुन ते दि. १७/०७/२०२५ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत महापालिकेच्या कार्यालयीन कामकाजाचे वेळी रोखीने विकत मिळतील. सदर कामाची इसारा रक्कम आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका या नावे देय असलेल्या डिमांड ड्राफ्टद्वारे भरावी लागेल व सदर डिमांड ड्राफ्ट लखोटा क्र. १ सोबत जोडावा लागेल. डिमांड ड्राफ्टद्वारे इसारा न भरलेल्या, खाडाखोड करुन स्वाक्षांकित न केलेल्या, मुदतीत न आलेल्या व सर्शत निविदा नाकारण्यात येतील. सदर कामी पुर्णपणे भरलेल्या मोहरबंद निविदा दिनांक ०८/०७/२०२५ पासून ते दि. १७/०७/२०२५ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यत महानगरपालिका विद्युत विभाग, मुख्यालय, विरार (पूर्व) येथे स्विकरण्यात येतील. प्राप्त निविदा प्र.कार्यकारी अभियंता (विद्युत), मुख्यालय, विरार (पूर्व) यांच्या दालनात हजर निविदाधारक अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष शक्यतो त्याच दिवशी दुपारी ४:०१ वा.अथवा इतर सोयीच्या दिवशी उघडण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नाव | अदांजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम रूपये | निविदा फॉम फी | सुरक्षा अनामत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | वसई विरार शहर महानगरपालिका, नवघर-माणिकपूर कार्यक्षेत्रात डॉ.हेडगेवार वाचनालयातील इमारतीमध्ये नव्याने केबलिंग, मुख्य व डिस्ट्रिब्युशन पॅनल व त्या अनुषंगाने इतर कामे करणे. | ९,००,६१५/- | रु.१०,०००/- | रू.५००/- +१८% GST ५९०/- | २ % डि.डि. ने व २ % देयकातुन | ३० दिवस |
| २. | वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (आय) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११३ मध्ये सुरुची बागेकडे जाणाऱ्या रस्त्यावरील विद्युत पोल वरील निकामी झालेल्या केबल काढून नव्याने केबलिंग करणे. | ९,९७,६९८/- | रु.१०,०००/- | रू.५००/- +१८% GST ५९०/- | २ % डि.डि. ने व २ % देयकातुन | ३० दिवस |

## अटी-शर्ती

१) कोरे निविदा फॉर्म खरेदीची अंतिम दि. १७/०७/२०२५ रोजी पर्यंत राहील.

२) ठेकेदाराने निविदा भरताना गुडस् ऍण्ड सर्विस टॅक्स (GST) चा विचार करुन निविदा दर भरावे. तसेच शासनाने वेळोवेळी लागू केलेले दर किंवा दर करार शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या धोरणाप्रमाणे सर्व समावेश करुन भरण्यात यावे.

३) ठेकेदारांनी निविदा भरताना दोन लिफाफा पद्धतीचा अवलंब करावा.

४) लिफाफा क्र.०१ मध्ये खालील कागदपत्रांच्या छायांकीत प्रतींचा समावेश असणे आवश्यक आहे.

**१) विद्युत ठेकेदार अनुज्ञाप्तीची छायांकीत प्रत, २) सा.बां.विभाग (विद्युत) यांचे कडील किमान १० लक्ष पर्यंतचे किंवा त्यावरील रक्कमेचे काम करण्याची क्षमता असलेले नोंदणी प्रमाणपत्राची छायांकीत प्रत ३) गुडस् ऍण्ड सर्विस टॅक्स (GST) नोंदणी छायांकीत प्रत, ४) ५०० रु.स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट-अ)(रजिस्टर नोटरी आवश्यक), ५) ५००/- रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर घोषणापत्र (परिशिष्ट-ब) (रजिस्टर नोटरी आवश्यक), ६) इसारा रक्कमेचे डिमांड ड्राफ्ट व ७) अनुभव प्रमाणपत्र - शासकीय, निमशासकीय संस्था, शासकीय महामंडळे इ. ठिकाणी किमान ३.३० लक्ष किंमतीचे एकच विद्युतीय काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र.**

५) निविदा उघडल्यानंतर निविदा मंजूरी व नंतर देयके अदा करताना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निदर्शनास आल्यास त्यास कंत्राटदार पूर्णपणे जबाबदार राहील. सदरची कागदपत्रे लिफाफा क्र. १ मध्ये नसल्यास संबंधित निविदाधारकास अपात्र ठरविण्यांत येऊन त्यांचा वित्तीय बोलीचा लिफाफा क्र. २ उघडण्यात येणार नाही.

६) कंत्राटदारानी द्वितीय लखोटयामध्ये बी - १ नमुन्यात दर भरण्यात यावे.

७) लिफाफा क. १ मधील कागदपत्रांची पुर्तता घेऊन ज्या कंत्राटदाराचे लिफाफा क्र. २ मधील देकार उघडण्यात येतील अशा निविदाकाराचे धनाकर्ष लिफाफे वगळता इतर कंत्राटदारांचे धनाकर्ष लिफाफे ७ दिवसात परत करण्यात येतील.

८) निम्नतम निविदाकारांना कार्यारंभ आदेश दिल्यानंतर ३ दिवसांत इतर निम्नतम निविदाकाराचा धनाकर्ष परत करण्यात येईल.

९) वरील पध्दतीमध्ये खोटी कागदपत्रे / धनाकर्ष सादर करणाऱ्या कंत्राटदारांची अनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल व संबंधित कंत्राटदाराला काळया यादीत सामाविष्ट करण्यात येईल. यासंबंधी मा.आयुक्त / मा.अति.आयुक्त / मा.उप-आयुक्त (विद्युत) यांना पुर्ण अधिकार राहतील.

१०) पुरवठा दाराने निविदा पत्रात मालाचे/साहित्याचे दर विहित केलेल्या रकान्यात स्पष्ट अंकात व अक्षरात खाडाखोड न करता लिहावेत. खाडाखोड झाल्यास त्याजागी निविदाकाराने स्वाक्षरी करणे बंधनकारक राहील.

११) निविदा कामाबाबत तीनपेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास फेरनिविदा मागविण्याचा तसेच कोणत्याही कारणाशिवाय निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

१२) निविदाधारकास शासनाकडुन भविष्यात होणारी करा संबधी वाढ/घट लागु राहिल.

१३) निविदेमध्ये नमुद केल्याप्रमाणे वार्षिक परिमाण (Approx, Annual Required Quantity) हे अंदाजित असून त्यामध्ये वाढ/ घट होऊ शकते. त्याबाबत कुठलाही दावा करता येणार नाही.

१४) निविदा कालावधीत बाजारभावात वाढ झाल्यास निविदेत दिलेल्या मंजूर दरानेच काम करणे बंधनकारक राहिल.

१५) धनाकर्ष उपलब्ध करुन देणे /धनाकर्ष परत करणे व इतर बाबींबाबत खालीलप्रमाणे कार्यवाहि करावी.

a) धनाकर्ष /बँक प्रतिपुर्ती हमी आयुक्त , वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नावे असाव्या.

b) धनाकर्ष/बँक प्रतिपुर्ती हमीची मुदत कामाच्या दोष दायीत्व कालावधीनंतर एक महिना कालावधी पर्यंत असावी.

c) धनाकर्षाची मुदत निविदा भरण्याच्या दिनांकानंतर किमान ३ महिने पर्यंत असावी.

d) धनाकर्षावर बॅकेचाMICR व IFSC कोड नंबर असणे आवश्यक आहे.

१६) निविदा मंजूर झाल्यानंतर मजूर ठेकेदारने अंदाजित खर्चाचा २% महानगरपालिकेकडे डिमांड ड्राफ्ट अथवा रोख भरणा करुन करारपत्र करावयाचे आहे व २% सुरक्षा अनामत रक्कम देयकातुन वेळोवेळी कपात करण्यात येईल .

१७) निविदेसोबत भरलेली सुरक्षा अनामत रक्कम ठेका संपुष्टात / दोष दायीत्त्व कालावधी संपल्यानंतर आपल्या लेखी मागणीनुसार ६ महिन्यांचा कालावधीनंतर परत करण्यात येईल.

१८) निविदेसोबत भरलेल्या अनामत रक्कमेवर कोणत्याही स्वरुपात व्याज दिले जाणार नाही.

१९) ठेकेदाराने निविदेत भरलेले कमीत कमी दराप्रमाणे उत्कृष्ट दर्जाचे काम करुन देणे बंधनकारक राहिल.

२०) निविदाबाबत काही शंका असल्यास माहितीसाठी विद्युत विभाग, मुख्यालय येथे संपर्क साधावा.

२१) मुदतीत प्राप्त झालेली निविदा दि.१७ / ०७ /२०२५ रोजी दु.४:०१ वाजता अथवा इतर सोयीच्या दिवशी उघडण्यात येईल.

२२) कोणतीही एक अथवा सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त,वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी राखुन ठेवला आहे.

जावक क्र. :वविशम/मु.विद्युत/६०५/२०२५
दिनांक : ०७/०७ /२०२५

(अमोल जाधव)
प्र.कार्यकारी अभियंता (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

# ५०० रुपये स्टॅम्प पेपरवरील नमुना

## (परिशिष्ठ "अ")

## प्रतिज्ञापत्र

मी / आम्ही याव्दारे असे नमुद करतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १० व कलम ११ तरतुदीच्या खाली उतंधृत केलेल्या आहेत. माहिती आहे आणि गंभिरपणे नमुद करतो की, महानगरपालिकेशी किंवा महानगरपालिकेच्या अधिन किंवा महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या संविदेमध्ये नगर परिषदेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध आमच्याशी नाही.

(कलम १० :- यापुढे तरतुद केली असेल त्या व्यतिरीक्त, महानगरपालिकेच्या आदेशावरुन केलेल्या कोणत्याही कामात किंवा, महानगरपालिकेशी किंवा अधिन किंवा महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेमध्ये जीचा स्वत:चा किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल.)

(कलम ११ :- पालिका सदस्य म्हणुन किंवा महानगरपालिकेच्या कोणत्याही समितीचा सदस्य म्हणुन ज्या कोणत्याही बाबीतीत कलम १० व कलम ११ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्याचा किंवा त्यांच्या भागीदारीचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रितीने कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल मग अश्या हिश्याची किंवा हितसंबंधाची किंमत काहीही असो, किंवा जीत ज्याचा अशीलाच्या, प्रकत्याचा किंवा इतर व्यक्ती च्या वतीने व्यवसायीकदृष्टया त्याचा हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशा कोणत्याही बाबतीत मतदान करील.)

निविदाधारकाचे नाव :- निविदाधारकाची सही

पत्ता :-

दिनांक :-

साक्षीदाराचे नाव :- साक्षीदाराची सही

पत्ता :-

दिनांक :-

# ५०० रुपये स्टॅम्प पेपरवरील नमुना
## (परिशिष्ठ "ब")
## सत्यप्रतिज्ञापत्र (Affidavit)

मी श्री.____________________ वय _____ वर्ष राहणार ______________________________ __________________________ या सत्यप्रतिज्ञापत्राद्वारे लिहून देतो की, मी मे.____________________________________________ या फर्मचा / कंपनीचा मालक असुन ________________________________________________________________________

__________ या कामासाठी आम्ही इच्छुक आहे. सदर कामाकरीता सादर केलेली कागदपत्रे खरी, बरोबर व पुर्ण आहेत. त्यामध्ये कोणत्याही त्रुटी चुका नाहीत. याची मी खात्री केलेली असुन असे शपथपुर्वक खालील अटी व शर्तीसह मान्य करीत आहे. या कागदपत्रामध्ये काही चुकीची, दिशाभुल करणारी, खोटी व तसेच अपुर्ण माहिती आढळल्यास मी भारतीय दंडसहित अंतर्गत कायदेशिर कारवाहीस पात्र राहीन.

१. जर कंत्राट कालावधी दरम्यान, मी माझ्या कार्यालयाने किंवा माझ्या कर्मचा-यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला/ विद्युत विभागाला कोणतीही खोटी माहिती किंवा देयक समवेत तसेच पत्रव्यवहार खोटी/ बनावट साहित्य खरेदीची कागदपत्रे सादर केली असल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कारवाहिस पात्र राहीन.

२. जर कंत्राट कालावधी दरम्यान, आणि काम समाप्ती नंतर, अंतिम देयक देण्याच्या तारखेपर्यंत सादर केलेले कोणतेही खोटी/ बनावट किंवा फसवी आढळयास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कारवाहीस पात्र राहीन.

३. जर काम समाप्तीनंतर दोष दायित्व कालावधी दरम्यान किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी, कोणतीही माहिती किंवा कागदपत्रे खोटी / बनावट, फसवी किंवा दिशाभुल करणारी आढळल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

कंत्राटदाराची सही व शिक्का